प-15

# बृहन्मुंबईमहानगरपालिका

लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई – २२

क्र.लो.टि.रु./ 35299 /व.आ. दिनांक: 14 / 12 / 2023

## जाहिरातीचा नमुना

लोकमान्य टिळक महानगरपलिका सर्वसाधारण रुग्णालयात हायपरवारिक ऑक्सिजन थेरपी विभागात कंत्राटी पद्धतीने सहाय्यक वैदयकीय अधिकारी यांची 3 पदे एका वेळी सहा महिन्यांकरीता व नंतर सेवाखंड देऊन पुन्हा सहा महिन्यांकरीता भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

सहाय्यक वैदयकीय अधिकारी पदासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेत स्थळावरुन अर्जाच्या नमुन्याची प्रत (Print) काढून त्यासोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून सदर अर्ज लोटिमस रुग्णालय, कॉलेज इमारत, तळमजला, रुम नं. 15, रोखपाल विभाग येथे रुपये 640 +18% जीएसटी रु.115/- एकूण रु.756/-(रुपये सातशे छप्पन फक्त) इतके शुल्क दि. 18·12·2023 ते 29·12·2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत भरण्यात यावेत. पूर्ण माहिती भरलेल्याअर्जासोबत शुल्काची पावती तसेच शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून लो.टि.म.स. रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि. 29·12·2023पर्यंत सादर करावेत.

| अनु. क्र. | पदाचे नाव | कालावधी | एकूण पदे | निश्चित ठोक प्रतिमाह मानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | सहाय्यक वैदयकीय अधिकारी | सहा महिने व कमाल एक वर्ष | 03 | एमबीबीएस डॉक्टर रु. 75000/-<br>बीएएमएस डॉक्टर रु. 50000/- |

**शैक्षणिक अर्हता –**

1. उमेदवाराने एम.बी.बी.एस.परिक्षा किंवा बीएएमएस परिक्षा उत्तीर्ण केलेली असावी.
2. संवंधित कामाचा 1 ते 2 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
3. वयोमर्यादा–उमेदवाराचे वय - 18 वर्षा पेक्षा कमी व 38 वर्षा पेक्षा जास्त असता कामा नये.
4. मराठीचे लेखी व तोंडी ज्ञान असणे आवश्यक.
5. ही नेमणूक केवळ तात्पुरत्या स्वरुपात असेल व उमेदवारास कोणत्याही प्रकारे नियमित कायम स्वरुपी नोकरी वर हक्क सांगता येणार नाही.
6. एमबीबीएस डॉक्टरांकरीता रु. 75000/- व बीएएमएस डॉक्टरांकरीता रु. 50000/- प्रति माह ठोक वेतन मिळेल.

सर्वसाधारण अटी व शर्ती :

७. कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

८. त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 179 दिवसानंतर एक दिवसाचा खंड देण्यात येईल.

९. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सोयीनुसार साप्ताहिक रजा व एक कॅलेंडर वर्षाला 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल. या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.

१०. कंत्राटी कालावधीत त्याचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवा समाप्त केली जाईल.

११. त्याची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

१२. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.

१३. नियुक्तीच्या वेळी उमेदवाराकडुन रु.100/-बॉड पेपरवर करारनामा करुन घेण्यात येईल.

१४. ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्याच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी करणे तसेच बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी लावणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्याची विनापरवानगी गैरहजेरी किंवा विनावेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

विशेष सुचना :

अ) या पुर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे , स्विकारणे इत्यादीचाअधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवायअर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

डॉ. मोहन जोशी,

अधिष्ठाता

लो.टि.म.वै.म. व लो.टि.म.स. रुग्णालय,

शीव, मुंबई ४०० ०२२

13/12 13/12.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## लो.टि.म.स वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई- ४०० ०२२.

### अर्जाचा नमुना

**पदाचे नावः ' सहाय्यक वैदयकीय अधिकारी '**

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत:

____________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव: ____________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता): ______________________________

4) पत्ता : ____________________________________________

____________________________________________

5) भ्रमणध्वनी क्र. ____________________ ईमेल आयडी- ____________________

6) लिंग- पुरुष __________ स्त्री __________

7) जन्मदिनांक: दिनांक______ महिना______ वर्ष ______

दिनांक- 01.12.2023 रोजी असलेले वय ______ महिने _____ दिवस___

8) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| एम.बी.बी.एस. परिक्षा | | | | | | | |
| बी.ए.एम.एस परिक्षा | | | | | | | |
| इतर | | | | | | | |

9) अनभव: ________________________________________

________________________________________

________________________________________

10)स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता: ________________________________________

________________________________________

11)उंची: __ फूट __ इंच, वजन: ____ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ / वर्ण:

______ नेत्र वर्ण: ______ वैयक्तिक खूण: ______________

12)संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित

केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

13)उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? - होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील: ______________________________

______________________________

______________________________

14)उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

15)उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली होय / नाही असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

16) मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

**आपला / आपली विश्वासू,**

**अर्जदाराची सही**
**(अर्जदाराचे नाव)**

**दिनांक:**